भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६

(१९७६ चा अधिनियम क्रमांक १९)

[३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Bonded Labour System (Abolition) Act, 1976

**(Act No. 19 of 1976)**

[As in force on the 31st August 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९६
[किंमत : रु.        ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला बॉन्डेड लेबर (अॅबॉलिशन) अॅक्ट, १९७६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक ३, दिनांक ७ डिसेंबर १९९५ यात पृष्ठ १२२ ते १२८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ७ डिसेंबर ,१९९५

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Bonded Labour System (Abolition) Act, 1976 as on the 31st August 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India Extraordinary Part XII, Section 1, No. 3, Vol. 6, dated 7th December 1995 on pages 122 to 128.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 7th December 1995

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

बुष ४२०५—१

# बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. अधिनियमास अधिभावी परिणाम असणे.

### प्रकरण २ रे

### बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन

४. बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन.
५. करार, रुढी इत्यादी शून्य होणे.

### प्रकरण ३ रे

### बंधऋणाची परतफेड करण्याचे दायित्व नष्ट होणे

६. बंधऋणाची परतफेड करण्याचे दायित्व नष्ट होणे.
७. बंधबिगाऱ्याची संपत्ती गहाण इ. पासून मुक्त होणे.
८. मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्यास घरवाडी, इत्यादीमधून काढून टाकावयाचे नाही.
९. रद्द झालेल्या ऋणापोटी धनकोने पैसे स्वीकारावयाचे नाहीत.

### प्रकरण ४ थे

### अंमलबजावणी करणारे प्राधिकारी

१०. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता विनिर्दिष्ट करता येतील असे प्राधिकारी.
११. पतपुरवठा होण्याची खात्रीलायक तजवीज करणे हे जिल्हा दंडाधिकारी व अन्य अधिकारी यांचे कर्तव्य.
१२. जिल्हा दंडाधिकारी व त्याने प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे कर्तव्य.

### प्रकरण ५ वे

१३. दक्षता समित्या.
१४. दक्षता समित्यांची कार्ये.
१५. माहितीचा भार.

### प्रकरण ६ वे

### अपराध व संपरीक्षेची कार्यपद्धती

१६. बंधबिगार करवून घेतल्याबद्दल शिक्षा.
१७. बंधऋण दिल्याबद्दल शिक्षा.
१८. बंधबिगार पद्धतीअन्वये बंधबिगार करवून घेतल्याबद्दल शिक्षा.
१९. बंधबिगाऱ्यास संपत्ती परत देण्याचे वर्जिल्याबद्दल किंवा त्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.
२०. अपराधास अपप्रेरणा देणे.
२१. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी अपराधांची संपरीक्षा करावयाची.
२२. अपराधांची दखल घेणे.
२३. कंपन्यांनी केलेले अपराध.

### प्रकरण ७ वे

### संकीर्ण

२४. सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कारवाईला संरक्षण.
२५. दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.
२६. नियम करण्याची शक्ती.
२७. निरसन व व्यावृत्ती.
शब्दसूची–इंग्रजी–मराठी
मराठी–इंग्रजी

# बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६

**(१९७६ चा अधिनियम क्रमांक १९)**

(३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान) [१ फेब्रुवारी, १९७६]

**जनतेतील दुर्बल घटकांचे आर्थिक व शारीरिक शोषण करण्यास आळा घालण्याच्या दृष्टीने बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन करणे आणि त्याच्याशी निगडित किंवा तदानुषंगिक बाबी यांसंबंधी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास 'बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.
(३) तो दिनांक २५ ऑक्टोबर, १९७५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "आगाऊ उचल" याचा अर्थ, एका व्यक्तीने (यात यापुढे तिचा निर्देश 'धनको' असा करण्यात आला आहे) दुसऱ्या व्यक्तीस (यात यापुढे तिचा निर्देश 'ऋणको' असा करण्यात आला आहे) दिलेले रोखरकमी किंवा ऐनजिनसी किंवा अंशतः रोखरकमी किंवा अंशतः ऐनजिनसी अग्रिम, असा आहे ;

(ख) "करार" याचा अर्थ, एखादा ऋणको व धनको यांच्यातील करार (मग तो लेखी असो किंवा तोंडी असो किंवा अंशतः लेखी व अंशतः तोंडी असो), असा आहे आणि यात, वेठबिगारीकरिता तरतूद करणाऱ्या ज्या कराराचे अस्तित्व संबंधित स्थानिक भागात प्रचलित असणाऱ्या कोणत्याही सामाजिक रिवाजानुसार गृहीत धरण्यात आलेले असते अशा कराराचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण.**—वेठबिगारीच्या पुढील प्रकारांच्या संबंधात, सामाजिक रूढीनुसार, ऋणको व धनको यांच्यामधील करार सामान्यतः गृहीत धरण्यात आलेला असतो, ते प्रकार असे :—

आदियामार, बारासासिया, बसह्या, बेठू, भागेला, चेरुमार, गरुंगलू, हाली, टरी, हरवाई, होलीया, जाना, जीथी, कामिया, खुण्डित-मुंडित, कुथिया, लेखेरी, मुंझी, मेट, मुनीश पद्धती, नित-मजूर, पलेरू, पडियाल, पन्नाईलाल, सागडो, संजी, संजावत, सेवक, सेवकिया, सेरी, वेट्टी.

(ग) "पूर्वज" किंवा "वंशज" याचा मातृप्रधान समाजातील व्यक्तीच्या संबंधातील अर्थ, अशा समाजात अंमलात असलेल्या उत्तराधिकार कायद्यानुसार अशा शब्दप्रयोगाशी अनुरूप असणारी व्यक्ती, असा आहे ;

(घ) "बंधऋण" याचा अर्थ, बंधबिगार पद्धतीअन्वये किंवा तदनुसार एखाद्या बंधबिगाऱ्याने मिळविलेले, किंवा मिळविले असल्याचे गृहित धरण्यात येणारे अग्रिम, असा आहे ;

(ङ) "बंधबिगार" याचा अर्थ, बंधबिगार पद्धतीअन्वये करण्यात आलेला कोणताही बिगार किंवा सेवा, असा आहे ;

(च) "बंधबिगारी" याचा अर्थ, ज्याच्यावर बंधऋण येते, अथवा ज्याच्यावर ते आले असेल किंवा आले असल्याचे गृहित धरण्यात येते तो मजूर, असा आहे ;

(छ) "बंधबिगार पद्धती" याचा अर्थ, ज्या अन्वये ऋणको हा धनकोबरोबर पुढील अर्थाचा करार करील किंवा त्याने तो केलेला असेल किंवा त्याने तो केला असल्याचे गृहीत धरण्यात येते अशी वेठबिगार पद्धती किंवा अंशतः वेठबिगार स्वरूपाची पद्धती असा आहे, ते असे :—

(एक) त्याने किंवा त्याच्या कोणत्याही रेषीय पूर्वजाने किंवा वंशजाने घेतलेल्या अग्रिमाच्या (मग अशा अग्रिमाच्या पुराव्यादाखल कोणताही दस्तऐवज असो वा नसो) प्रतिफलादाखल आणि अशा अग्रिमावर कोणतेही व्याज देय असल्यास, त्या व्याजाच्या प्रतिफलादाखल, किंवा

(दोन) कोणत्याही रूढी प्राप्त किंवा सामाजिक आबंधनानुसार, किंवा

(तीन) उत्तराधिकाराद्वारे त्याच्याकडे प्रक्रांत होणाऱ्या एखाद्या आबंधनानुसार, किंवा

(चार) त्याला किंवा त्याच्या रेषीय पूर्वजांपैकी किंवा वंशजांपैकी कोणालाही मिळालेल्या कोणत्याही द्रव्यरुप प्रतिफलाच्या बदल्यात, किंवा

(पाच) एखाद्या विशिष्ट जातीत किंवा समाजात त्याचा जन्म झाला आहे म्हणून,

तो—

(१) स्वतः किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीमार्फत किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत धनकोकडे किंवा त्या धनकोच्या फायद्यासाठी विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत किंवा विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या मुदतीपर्यंत विनावेतन किंवा नाममात्र वेतन घेऊन मजुरी करील किंवा सेवा उपलब्ध करून देईल, किंवा

(२) विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत किंवा विनिर्दिष्ट न केलेल्या मुदतीपर्यंत कामधंदा किंवा चरितार्थाचे अन्य साधन शोधण्याचे स्वतःचे स्वातंत्र्य गमावील, किंवा

(३) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्त संचार करण्याचा आपला अधिकार गमावील, किंवा

(४) स्वतःच्या कोणत्याही संपत्तीचा किंवा त्यांच्या किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या श्रमाच्या फळाचा विनियोग करण्याचा किंवा ते बाजारभावाने विकण्याचा अधिकार गमावील ;

आणि ऋणकोने ऋणाची परतफेड करण्यात कसूर केल्यास ऋणकोचा जामीनदार हा ऋणकोच्या वतीने बंधबिगार करील, अशा आशयाचा करार ज्या पद्धतीत तो जामीनदार धनकोबरोबर करतो, किंवा त्याने तो केला असेल किंवा त्याने तो केला असल्याचे गृहीत धरण्यात येते, ती वेठबिगारीची किंवा अंशतः वेठबिगारीची पद्धती या शब्दप्रयोगात समाविष्ट आहे ;

[1][**स्पष्टीकरण.**—शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७० याच्या कलम २, पोट-कलम (१) खंड (ख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जो कंत्राटी कामगार असेल किंवा आंतरराज्यीय प्रवासी कामगार (रोजगाराचे नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९७९ याच्या कलम २, पोट-कलम (१), खंड (ड) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जो आंतरराज्यीय प्रवासी कामगार असेल, अशा कोणत्याही कामगाराला ज्या वेठबिगारीच्या किंवा अंशतः वेठबिगारीच्या पद्धतीखाली या खंडाच्या उपखंड (१) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरुपाच्या परिस्थितीत किंवा उपखंड (२) ते (४) मध्ये निर्देशिलेल्या निःसमर्थतांपैकी सर्व किंवा कोणत्याही निःसमर्थतेच्या अधीन असताना, काम किंवा सेवा करण्यास भाग पाडले जात असेल ती पद्धती, म्हणजे या खंडाच्या अर्थांतर्गत 'बंधबिगार पद्धती' होय.]

(ज) "कुटुंब" यात, व्यक्तीच्या पूर्वजांचा व वंशजांचा समावेश होतो ;

(झ) "नाममात्र वेतन" याचा कोणत्याही मजुरीच्या संबंधातील अर्थ,—

(क) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्याच किंवा तत्सम मजुरीच्या संबंधात, शासनाने निश्चित केलेले किमान वेतन ; आणि

(ख) एखाद्या प्रकारच्या मजुरीच्या संबंधात असे कोणतेही वेतन निश्चित करण्यात आले नसेल त्याबाबतीत, त्याच स्थानिक भागात काम करणाऱ्या बिगाऱ्यांना तेच किंवा तत्सम स्वरूपाचे काम केल्याबद्दल सामान्यतः देण्यात येणारे वेतन.

यापेक्षा कमी असेल ते वेतन, असा आहे ;

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

**अधिनियमास अधिभावी परिणाम असणे.** ३. या अधिनियमाखेरीज अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणाम होणाऱ्या कोणत्याही संलेखात या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, हे उपबंध परिणामक ठरतील.

## प्रकरण २ रे

### बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन

**बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन.** ४. (१) या अधिनियमाचा प्रारंभ होताच बंधबिगार पद्धतीचे उच्चाटन होईल आणि असा प्रारंभ होताच, प्रत्येक बंधबिगारी कोणतीही बंधबिगार करण्याच्या आबंधनापासून मुक्त व स्वतंत्र होईल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणतीही व्यक्ती,—

(क) बंधबिगार पद्धतीअन्वये किंवा तीनुसार कोणतेही अग्रिम देणार नाही, किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीस बंधबिगार करण्याची किंवा अन्य प्रकारचा वेठबिगार करण्याची सक्ती करणार नाही.

**करार, रुढी, इ. शून्य होणे.** ५. जिच्या आधारे कोणत्याही व्यक्तीस किंवा अशा व्यक्तीच्या कुटुंबातील किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, बंधबिगार म्हणून कोणतेही काम करणे किंवा सेवा करणे भाग पडत असेल अशी कोणतीही रुढी किंवा परंपरा किंवा संविदा, करार किंवा अन्य संलेख मग तो या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी किंवा नंतर करण्यात आलेला असो, या अधिनियमाचा प्रारंभ होताच शून्य व अप्रवर्ती ठरेल.

---

१. १९८५ चा अधिनियम ७३, कलम २ द्वारे, खंड (छ) च्या शेवटी हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण ३ रे

### बंधऋणाची परतफेड करण्याचे दायित्व नष्ट होणे

६. (१) या अधिनियमाचा प्रारंभ होताच प्रत्येक बंधबिगाऱ्यावर असलेले कोणतेही बंधऋण किंवा अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, कोणत्याही बंधऋणाचा चुकते करण्याचे राहून गेलेला असा भाग यांची परतफेड करण्याचे दायित्व नष्ट झाले असल्याचे मानण्यात येईल. बंधऋणाची परतफेड करण्याचे दायित्व नष्ट होणे.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणतेही बंधऋण किंवा त्याचा कोणताही भाग यांच्या वसुलीकरता कोणत्याही दिवाणी न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही होऊ शकणार नाही.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, बंधऋणाच्या वसुलीकरता काढण्यात आलेल्या आणि अशा प्रारंभाच्या पूर्वी पूर्णपणे पूर्ती न झालेल्या प्रत्येक हुकूमनाम्याची किंवा आदेशाची, अशा प्रारंभानंतर पूर्णपणे पूर्ती झाली असल्याचे मानण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही बंधऋणाच्या वसुलीकरीता करण्यात आलेली प्रत्येक जप्ती, अशा प्रारंभ होताच, विलोपित होईल; आणि अशा जप्तीच्या अनुरोधाने बंधबिगाऱ्याची कोणतीही जंगम मालमत्ता त्याच्या कब्जातून काढून सक्तीने ताब्यात घेतली गेली असेल आणि ती विकण्यात येईतोपर्यंत कोणत्याही न्यायालयाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या ताब्यात ठेवण्यात आली असेल अशा बाबतीत, अशा प्रारंभानंतर, अशी जंगम मालमत्ता, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, बंधबिगाऱ्याच्या कब्जात परत देण्यात येईल.

(५) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, बंधबिगारी किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याच्यावर अवलंबून असणारी अन्य व्यक्ती याच्या मालकीच्या कोणत्याही संपत्तीचा कब्जा कोणत्याही धनकोने एखाद्या बंधऋणाच्या वसुलीकरता त्याच्याकडून जबरदस्तीने काढून घेतला असेल त्या बाबतीत, अशी संपत्ती जिच्याकडून ती सक्तीने घेतली होती त्या व्यक्तीच्या कब्जात परत देण्यात येईल.

(६) पोटकलम (४) किंवा पोटकलम (५) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे कोणतीही संपत्ती, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत परत कब्जात न दिल्यास, त्यामुळे नाराज झालेल्या व्यक्तीस, अशा संपत्तीचा कब्जा परत मिळविण्यासाठी विहित असेल अशा मुदतीत विहित प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल आणि विहित प्राधिकरण, धनकोस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेश देऊन, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत संबंधित संपत्तीचा कब्जा अर्जदाराकडे परत करण्याचा निदेश देऊ शकेल.

(७) पोटकलम (६) खाली कोणत्याही विहित प्राधिकरणाने केलेला आदेश दिवाणी न्यायालयाने केलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल आणि ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये धनको स्वेच्छेने राहतो किंवा धंदा चालवतो किंवा प्राप्तीसाठी स्वत: व्यवसाय करतो अशा, सर्वांत कमी द्रव्याधिकारिता असणाऱ्या न्यायालयाला अशा आदेशाची अंमलबजावणी करता येईल.

(८) शंका निरसनाकरिता याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, बंधऋणाच्या वसुलीकरिता काढण्यात आलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करताना या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणतीही जप्त करण्यात आलेली संपत्ती विकण्यात आली असेल त्या बाबतीत अशा विक्रीस या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधामुळे बाध येणार नाही :

परंतु, बंधबिगाऱ्याला किंवा त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याला, अशा प्रारंभापासून पाच वर्षाच्या मुदतीत केव्हाही, ज्या रकमेच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला होता अशा विक्रीच्या जाहीरनाम्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम-हुकूमनामाधारकाला अशा विक्रीच्या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून मिळाली असेल अशी कोणतीही रक्कम आणि तसेच दरम्यानचे उत्पन्न त्यातून वजा करुन हुकूमनामाधारकाला देण्यासाठी न्यायालयामध्ये जमा करुन विक्री रद्द ठरवून घेण्यासाठी अर्ज करता येईल.

(९) बंधबिगार पद्धतीअन्वये कोणत्याही दायित्वाची अंमलबजावणी करवून घेण्यासाठी कोणताही दावा किंवा कार्यवाही यात, बंधबिगाऱ्यास दिलेल्या अग्रिमाच्या वसुलीकरिता केलेला दावा किंवा कार्यवाही यांचाही समावेश आहे—या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी प्रलंबित असेल त्या बाबतीत, असा दावा किंवा अशी कार्यवाही असा प्रारंभ होताच काढून टाकल्यागत ठरेल.

(१०) या अधिनियमाचा प्रारंभ होताच दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्यात आलेल्या प्रत्येक बंधबिगाऱ्यास—मग तो, न्यायनिर्णयापूर्वी स्थानबद्ध केलेला असो किंवा नंतर केलेला असो-ताबडतोब स्थानबद्धतेतून मुक्त करण्यात येईल.

बंधबिगाऱ्याची संपत्ती गहाण, इ. पासून मुक्त होणे.

७. (१) बंधबिगाऱ्याच्या ठायी निहित असलेली जी संपत्ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही बंधऋणाच्या संबंधातील कोणतेही गहाण, प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य बोजे याखाली असेल ती सर्व संपत्ती तिचा बंधऋणाशी संबंध असेल तेथवर, असे गहाण, प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य बोजे यांपासून मुक्त आणि स्वतंत्र अशा अवस्थेत राहील आणि अशी कोणतीही संपत्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी गहाणधारक, प्रभारधारक, धारणाधिकारी किंवा बोजाधारक यांच्या-कब्जात असेल त्या बाबतीत, अशी संपत्ती (ती अन्य कोणत्याही प्रभारास अधीन असल्यास तेवढी बाब खेरीज करुन एरव्ही) असा प्रारंभ होताच, बंधबिगाऱ्याच्या कब्जात परत देण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली कोणतीही संपत्ती बंधबिगाऱ्याच्या कब्जात परत देण्यात कोणताही विलंब झाल्यास, असा बंधबिगारी, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये अशी संपत्ती असेल असे, सर्वांत कमी द्रव्याधिकारिता असलेले दिवाणी न्यायालय निश्चित करील असे दरम्यानचे उत्पन्न हे गहाणधारक, धारणाधिकारी, प्रभारधारक किंवा बोजाधारक यांच्याकडून वसूल करण्यास अशा प्रारंभाच्या दिनांकी व तेव्हापासून हक्कदार होईल.

मुक्त करण्यात असलेल्या बंधबिगाऱ्यास घरवाडी, इ. मधून काढून टाकावयाचे नाही.

८. (१) कोणताही बंधबिगार करण्याच्या कोणत्याही दायित्वापासून मुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, बंधबिगारी प्रतिफल म्हणून, ती व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जेथे रहात होती अशा कोणत्याही घरवाडीमधून किंवा अन्य राहण्याच्या वास्तूमधून तिला काढून टाकता येणार नाही.

(२) जर या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, अशा कोणत्याही व्यक्तीस पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही घरवाडीमधून किंवा निवासी जागेमधून धनकोने काढून टाकले तर, ज्या उप विभागात अशी घरवाडी किंवा निवासी जागा येत असेल त्या उप विभागाच्या प्रभारी कार्यकारी दंडाधिकारी, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, अशी घरवाडी किंवा अन्य निवासी जागा यांचा कब्जा बंधबिगाऱ्याकडे परत देववील.

रद्द झालेल्या ऋणापोटी धनकोने पैसे स्वीकारावयाचे नाहीत.

९. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या आधारे रद्द झालेल्या किंवा रद्द झाले असल्याचे किंवा पूर्णपणे चुकते झाले असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही बंधऋणापोटी कोणत्याही धनकोला काहीही पैसे स्वीकारता येणार नाहीत.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करणारी कोणीही व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास तसेच द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) पोटकलम (२) अन्वये एखाद्या व्यक्तीस दोषी ठरविणारे कोणतेही न्यायालय त्या पोटकलमाखाली देण्यात येतील त्या शिक्षांव्यतिरिक्त आणखी आदेश देऊन त्या व्यक्तीने पोटकलम (१) च्या उपबंधांचे उल्लंघन करुन स्वीकारलेली रक्कम बंधबिगाऱ्यास परत करण्याकरता, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तितक्या मुदतीत न्यायालयाकडे जमा करण्याचा निदेश देऊ शकेल.

## प्रकरण ४ थे

### अंमलबजावणी करणारे प्राधिकारी

या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता विनिर्दिष्ट करता येतील असे प्राधिकारी.

१०. राज्य शासन, या अधिनियमाच्या उपबंधांशी योग्यरीत्या अंमलबजावणी करण्यात येईल अशी खात्रीलायक तजवीज करण्याकरता आवश्यक असतील अशा शक्ती जिल्हा दंडाधिकाऱ्याला प्रदान करु शकेल व अशी कर्तव्ये त्याला नेमून देऊ शकेल आणि जिल्हा दंडाधिकारी, त्याला दुय्यम असणारा कोणता अधिकारी अशा प्रकारे प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्तींचा वापर करील आणि अशा प्रकारे नेमून देण्यात आलेली सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कर्तव्ये पार पाडील ते विनिर्दिष्ट करु शकेल आणि अशा विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला कोणत्या स्थानिक सीमांच्या आत अशा शक्ती वापराव्या लागतील किंवा अशी कर्तव्ये पार पाडावी लागतील तेही विनिर्दिष्ट करु शकेल.

पतपुरवठा होण्याची खात्रीलायक तजवीज करणे हे जिल्हा दंडाधिकारी व अन्य अधिकारी यांचे कर्तव्य.

११. कलम १० अन्वये राज्य शासनाने प्राधिकृत केलेला जिल्हा दंडाधिकारी आणि त्या कलमान्वये जिल्हा दंडाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेला अधिकारी, व्यवहार्य असेल तेथवर, बंधबिगाऱ्यास आणखी कोणतेही बंधन घेण्याचा प्रसंग येऊ नये किंवा त्यास तसे कारण पडू नये याकरिता अशा बंधबिगाऱ्याचे आर्थिक हितसंबंध सुनिश्चित व संरक्षित करुन त्याद्वारे, त्या मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्याच्या कल्याणवृद्धीसाठी प्रयत्न करतील.

जिल्हा दंडाधिकारी व त्याने प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे कर्तव्य.

१२. जिल्हा दंडाधिकारी व कलम १० अन्वये त्याने प्राधिकृत केलेला प्रत्येक अधिकारी याने, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने कोणत्याही बंधबिगार पद्धतीची किंवा अन्य कोणत्याही वेठबिगार पद्धतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे किंवा कसे याबद्दल चौकशी करील आणि जर अशा चौकशीअंती, बंधबिगार पद्धतीची किंवा अन्य कोणत्याही वेठबिगार पद्धतीची अंमलबजावणी करणारी कोणीही व्यक्ती आढळल्यास तो, ताबडतोब, अशा वेठबिगारीच्या अंमलबजावणीचे निर्मुलन करण्याकरिता आवश्यक असेल अशी कारवाई करील.

## प्रकरण ५ वे

### दक्षता समिती

१३. (१) प्रत्येक राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रत्येक जिल्ह्यात व प्रत्येक उप विभागात त्यास योग्य वाटतील इतक्या दक्षता समित्यांची स्थापना करील. दक्षता समित्या.

(२) जिल्ह्याकरिता स्थापन केलेली प्रत्येक दक्षता समिती पुढील सदस्य मिळून बनलेली असेल, ते असे :—

(क) जिल्हा दंडाधिकारी, किंवा त्याने नामनियुक्त केलेला इसम हा अध्यक्ष होईल ;

(ख) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्या घटक असलेल्या व त्या जिल्ह्यात राहणाऱ्या तीन व्यक्ती :—

जिल्हा दंडाधिकाऱ्याने या नामनियुक्त करावयाच्या ;

(ग) त्या जिल्ह्यातील रहिवासी असलेले दोन समाजसेवक—जिल्हा दंडाधिकाऱ्याने नामनियुक्त करावयाचे ;

(घ) ग्रामविकासाशी संबंधित असलेल्या, जिल्ह्यातील सरकारी व बिनसरकारी यंत्रणांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता जास्तीत जास्त तीन व्यक्ती—राज्य शासनाने या नामनियुक्त करावयाच्या ;

(ङ) जिल्ह्यातील वित्तीय व पतसंस्थांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता एक व्यक्ती-जिल्हा दंडाधिकाऱ्याने ही नामनियुक्त करावयाची.

(३) उप विभागाकरिता स्थापन केलेली प्रत्येक दक्षता समिती पुढील सदस्य मिळून बनलेली असेल ते असे :—

(क) उप विभागीय दंडाधिकारी किंवा त्याने नामनियुक्त केलेला इसम—हा अध्यक्ष होईल ;

(ख) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्या घटक असलेल्या व त्या उप विभागात राहणाऱ्या तीन व्यक्ती—या उप विभागीय दंडाधिकाऱ्याने नामनियुक्त करावयाच्या;

(ग) त्या उप विभागात राहणारे दोन समाजसेवक—हे उप विभागीय दंडाधिकाऱ्याने नामनियुक्त करावयाचे ;

(घ) ग्रामविकासाशी संबंधित असलेल्या, उप विभागातील सरकारी किंवा बिनसरकारी यंत्रणांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता जास्तीत जास्त तीन व्यक्ती—या जिल्हा दंडाधिकाऱ्याने नामनियुक्त करावयाच्या ;

(ङ) उप विभागातील वित्तीय व पतसंस्थांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता एक व्यक्ती—उप विभागीय ही दंडाधिकाऱ्याने नामनियुक्त करावयाची ;

(च) कलम १० अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेला व त्या उप विभागात कार्य करणारा एक अधिकारी.

(४) प्रत्येक दक्षता समिती स्वतःच आपल्या कार्यपद्धतीचे विनियमन करील आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे—

(क) जिल्ह्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या दक्षता समितीच्या बाबतीत, जिल्हा दंडाधिकारी,

(ख) उप विभागाकरिता स्थापन करण्यात आलेल्या दक्षता समितीच्या बाबतीत, उप विभागीय दंडाधिकारी, यांच्याकडून सचिवीय सहाय्याची व्यवस्था करण्यात येईल.

(५) दक्षता समितीच्या रचनेमध्ये किंवा तिच्या कार्यपद्धतीमध्ये कोणताही दोष आहे एवढ्याच केवळ कारणावरून दक्षता समितीची कोणतीही कायवाही विधिबाह्य ठरणार नाही.

१४. (१) दक्षता समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :— दक्षता समित्यांची कार्ये.

(क) या अधिनियमाचे उपबंध किंवा त्यांखाली करण्यात आलेला कोणताही नियम यांची योग्य रीत्या अंमलबजावणी होईल अशी खात्रीलायक तजवीज होण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न व करण्यात आलेली कारवाई याबाबत जिल्हा दंडाधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी यांना माहिती कळवणे;

(ख) मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक पुनर्वसनाची तरतूद करणे;

(ग) मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्यांना पुरेसा पतपुरवठा सुसूत्रपणे होत रहावा या दृष्टीने ग्रामीण बँका व सहकारी संस्था यांच्या कार्यांचा समन्वय करणे;

(घ) या अधिनियमान्वये ज्यांची दखल घेण्यात आली आहे असे किती अपराध घडले त्यांवर नजर ठेवणे;

(ङ) या अधिनियमान्वये ज्याची दखल घेणे आवश्यक आहे असा कोणताही अपराध घडत आहे किंवा कसे याची पाहणी करणे;

(च्) कोणत्याही मुक्त बंधबिगाऱ्याविरुद्ध किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीविरुद्ध किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणत्याही बंधऋणाची अथवा जे ऋण हे बंधऋण असल्याचा दावा अशा व्यक्तीने केला असेल अशा अन्य कोणत्याही ऋणाची पूर्णतः किंवा अंशतः वसुली करण्यासाठी, मांडण्यात आलेल्या कोणत्याही दाव्यात बचाव देणे.

(२) दक्षता समिती, मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्याविरुद्ध लावण्यात आलेल्या दाव्यात बचाव देण्याकरिता तिच्या एखाद्या सदस्यास प्राधिकृत करू शकेल आणि अशा प्रकारे प्राधिकृत करण्यात आलेला सदस्य हा या दाव्याच्या प्रयोजनाकरिता, मुक्त करण्यात आलेल्या बंधबिगाऱ्याचा प्राधिकृत अभिकर्ता असल्याचे मानण्यात येईल.

शाबितीचा भार. १५. जेव्हा जेव्हा एखादे ऋण हे बंधऋण असल्याचा दावा एखादा बंधबिगारी किंवा दक्षता समिती करील तेव्हा तेव्हा त्याबाबतीत, असे ऋण हे बंधऋण नाही हे सिद्ध करण्याचा भार धनकोवर राहील.

## प्रकरण ६ वे

### अपराध व संपरीक्षेची कार्यपद्धती

बंधबिगार करवून घेतल्याबद्दल शिक्षा. १६. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, जो कोणी कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा बंधबिगार करण्यास भाग पाडील तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

बंधऋण दिल्याबद्दल शिक्षा. १७. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, जो कोणी कोणतेही बंधऋण देईल तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

बंधबिगार पद्धतीअन्वये बंधबिगार करवून घेतल्याबद्दल शिक्षा. १८. ज्याच्या आधारे कोणत्याही व्यक्तीस किंवा अशा व्यक्तीच्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीस किंवा अशा व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीस बंधबिगार पद्धतीअन्वये कोणत्याही प्रकारचे काम करावे लागते अशी कोणतीही रूढी, परंपरा, संविदा, करार किंवा अन्य संलेख याची जो कोणी या अधिनियमाच्या प्रारंभानंतर अंमलबजावणी करील तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल; आणि असा द्रव्यदंड वसूल करण्यात आल्यास त्यामधून, जितके दिवस बंधबिगाऱ्याकडून बंधबिगार करवून घेण्यात आला तितक्या दिवसांचे, दर दिवसाला पाच रुपये या दराने बंधबिगाऱ्यास पैसे देण्यात येतील.

बंधबिगाऱ्यांस संपत्ती परत देण्याचे वर्जिल्याबद्दल किंवा त्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा. १९. जो कोणी या अधिनियमाद्वारे तसे आवश्यक करण्यात आले असता, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही बंधबिगाऱ्याकडे त्याची कोणतीही संपत्ती परत देण्याचे वर्जील किंवा त्याकामी कसूर करील तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल; आणि असा द्रव्यदंड वसूल करण्यात आल्यास त्यामधून, जितके दिवस संपत्तीचा कब्जा देण्यात आला नव्हता तितक्या दिवसांचे, दर दिवसाला पाच रुपये या दराने बंधबिगाऱ्यास पैसे देण्यात येतील.

अपराधास अपप्रेरणा देणे. २०. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असणाऱ्या अपराधास जो कोणी अपप्रेरणा देईल—मग अशा प्रकारे अपप्रेरणा देण्यात आलेला अपराध करण्यात आलेला असो वा नसो,—तो, अशा अपप्रेरणा देण्यात आलेल्या अपराधाकरिता जी शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली असेल त्याच शिक्षेस पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ "अपप्रेरणा देणे" या शब्दप्रयोगास 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५) यामध्ये त्याला नेमून देण्यात आलेला अर्थ आहे.

कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी अपराधांची संपरीक्षा करावयाची. २१. राज्य शासन या अधिनियमाखालील अपराधांची संपरीक्षा करण्याकरिता कार्यकारी दंडाधिकाऱ्याला, प्रथम किंवा द्वितीय वर्गाच्या न्यायिक दंडाधिकाऱ्याच्या शक्ती प्रदान करू शकेल; आणि अशा प्रकारे शक्ती प्रदान करण्यात आल्यावर, ज्याला याप्रमाणे शक्ती प्रदान करण्यात आल्या आहेत असा कार्यकारी दंडाधिकारी 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याच्या प्रयोजनांपुरता, प्रथम वर्गाचा किंवा, प्रकरणपरत्वे, द्वितीय वर्गाचा न्यायिक दंडाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधांची दंडाधिकाऱ्याला संक्षिप्तपणे संपरीक्षा करता येईल.

अपराधांची दखल घेणे. २२. या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध दखलपात्र व जामीनपात्र असेल.

कंपन्यांनी केलेले अपराध. २३. (१) जर या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल तिची प्रभारी होती किंवा तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केलेला असेल, आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो अपराध करण्यात आला होता अथवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा अन्य व्यक्तींचा संघ यांचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

२४. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणतेही राज्य शासन किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा दक्षता समितीचा कोणताही सदस्य यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कारवाईला संरक्षण.

२५. ज्या बाबतीत या अधिनियमाचा कोणताही उपबंध लागू होतो अशा कोणत्याही बाबतीत कोणत्याही दिवाणी न्यायालयाला अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या अशा कोणत्याही गोष्टींसंबंधी कोणत्याही दिवाणी न्यायालयाकडून व्यादेश दिला जाणार नाही. दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.

२६. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम ६ च्या पोटकलम (४) किंवा पोटकलम (५) मध्ये निर्देशिलेल्याप्रमाणे संपत्तीचा कब्जा परत देण्याबाबत त्या कलमाच्या पोटकलम (६) अन्वये कोणत्या प्राधिकरणाकडे अर्ज द्यावयाचा;

(ख) कलम ६ च्या पोटकलम (६) अन्वये संपत्तीचा कब्जा परत देण्याबाबत विहित प्राधिकरणाकडे किती मुदतीत अर्ज करावयाचा;

(ग) या अधिनियमाच्या उपबंधांची किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांची अंमलबजावणी होईल अशी खालीलायक तजवीज करण्यासाठी कलम १४—पोटकलम (१)—खंड (क) अन्वये दक्षता समित्यांनी करावयाची उपाययोजना;

(घ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) केंद्र सरकारने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

२७. (१) 'बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अध्यादेश, १९७५' (१९७५ चा १७) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, या अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (यात, कोणतीही अधिसूचना प्रसिद्ध करणे, निदेश देणे, नामनियुक्ती करणे, शक्ती प्रदान करणे, कर्तव्य नेमून देणे किंवा अधिकारी विनिर्दिष्ट करणे यांचा समावेश होतो) ही, या अधिनियमाच्या तद्नुरूप उपबंधान्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

एच ४२०५—३ (१,०२६—२-९६)

# THE BONDED LABOUR SYSTEM (ABOLITION) ACT, 1976

## बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| advance | आगाऊ उचल | [S. 2(a)] |
| advise | माहिती कळविणे | [S. 14(1)(a)] |
| agreement | करार | [S. 2(b)] |
| ascendant | पूर्वज | [S. 2(c)] |
| attachment | जप्ती | [S. 6(4)] |
| bonded debt | बंधऋण | [S. 2(d)] |
| bonded labour | बंधबिगार | [S. 2(e)] |
| bonded labourer | बंधबिगारी | [S. 2(f)] |
| bonded labour system | बंधबिगार पद्धती | [S. 2(g)] |
| canalise adequate credit | पतपुरवठा सुसूत्रपणे करीत राहणे | [S. 14(1)(c)] |
| creditor | धनको | [S. 2(b)] |
| debtor | ऋणको | [S. 2(b)] |
| defend a suit | दाव्यात बचाव देणे | [S. 14(1)(f)] |
| descendant | वंशज | [S. 2(c)] |
| ensure credit | पतपुरवठा होण्याची खात्रीलायक तजवीज करणे | [S. 11-m.n.] |
| extinguished debt | रद्द झालेले ऋण | [S. 9-m.n] |
| forced labour | वेठबिगार | [S. 2(b)] |
| in cash | रोखरकमी | [S. 2(a)] |
| injunction | व्यादेश | [S. 25] |
| in kind | ऐनजिनसी | [S. 2(a)] |
| labour | मजुरी | [S. 2(i)] |
| locality | स्थानिक भाग | [S. 2(b)] |
| mesne profits | दरम्यानचे उत्पन्न | [S. 6(8)-proviso] |
| nominal wages | नाममात्र वेतन | [S. 2(i)] |
| nominate | नामनियुक्त करणे | [S. 13(a)] |
| overriding effect | अधिभावी परिणाम | [S. 3-m.n.] |
| proclamation of sale | विक्रीचा जाहीरनामा | [S. 6(8)-proviso] |
| secretarial assistance | सचिवीय सहाय्य | [S. 13(4)] |
| Vigilance Committee | दक्षता समिती | [S. 13-m.n.] |
| void and inoperative | शून्य व अप्रवर्ती | [S. 5] |

# जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

# THE REGISTRATION OF BIRTHS AND DEATHS ACT, 1969

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आकडेवार अहवाल | .. statistical report | [क. १९(२)] |
| एकसूत्रता आणणे .. | .. unify | [क. ४(४)] |
| खाणावळ .. | .. boarding-house | [क. ८(१) (घ्)] |
| गर्भमृत्यु .. | .. foetal death | [क. २ (ग्)] |
| गर्भवहन-काळ .. | .. period of gestation | [क. २ (छ्)] |
| गृहप्रमुख .. | .. head of the house | [क. ८(१) (क्)] |
| जन्म .. | .. birth | [क. २(क्)] |
| जिल्हा निबंधक .. | .. District Registrar | [क. ६(१)] |
| जिवंत अवस्थेतील जन्म | .. live-birth | [क. २(घ्)] |
| जिवंत जन्मलेला .. | .. live-born | [क. २(घ्)] |
| तपशील .. | .. addition | [क. ७(४)] |
| (मळ्याचा) देखरेखदार | .. superintendent (of the plantation) | [क. ९-स्पष्टीकरण] |
| दुय्यम निबंधक .. | .. Sub-Registrar | [क. ७(५)] |
| धारणगर्भ .. | .. product of conception | [क. २(ग्)] |
| निबंधक, जन्म व मृत्यू | .. Registrar of Births and Deaths | [क. ७(४)] |
| निवासगृह .. | .. lodging house | [क. ८(१) (घ्)] |
| नोंदणी विभाग .. | .. registration division | [क. ५] |
| परिवार .. | .. household | [क. ८(१) (क्)] |
| परिवार प्रमुख .. | .. head of the household | [क. ८(१) (क्)] |
| पर्यवेक्षण करणे .. | .. supervise | [क. ४(४)] |
| पांथशाला .. | .. tavern | [क. ८(१) (घ्)] |
| प्रतिवेदन .. | .. return | [क. १९(१)] |
| प्रसाविका .. | .. midwife | [क. १०(१) (एक)] |
| फी किंवा मोबदला | .. fee or reward | [क. ७(२)] |
| बराक .. | .. barrack | [क. ८(१) (घ्)] |
| बाहेर काढणे .. | .. extraction | [क. २(ग्)] |
| बाहेर पडणे .. | .. expulsion | [क. २(ग्)] |
| महानिबंधक .. | .. Registrar-General | [क. ३(२)] |
| मळा .. | .. plantation | [क. ९-स्पष्टीकरण] |
| माहितीदार .. | .. informant | [क. ११-स.टी.] |
| मुखिया .. | .. headman | [क. ८(१) (घ्)] |
| मुख्य कार्यकारी प्राधिकरण | .. chief executive authority | [क. ४(३)] |
| मुख्य निबंधक .. | .. Chief Registrar | [क. ४(१)] |
| मृतावस्थेतील जन्म .. | .. still-birth | [क. २ (छ्)] |
| मृत्यू .. | .. death | [क. २ (ख्)] |
| रक्षक .. | .. keeper | [क. १०(१) (दोन)] |
| राहण्याचे ठिकाण .. | .. place of abode | [क.११] |
| लेखप्रमाणक .. | .. notary public | [क. १३(२)] |
| विनादोषारोप सोडणे | .. discharge | [क. २४ (२)] |
| वैद्यकीय किंवा आरोग्य उपचारक | .. medical or health attendant | [क. १०(१) (एक)] |
| समन्वय साधणे .. | .. co-ordinate | [क. ४(४)] |
| सराई .. | .. choultry | [क. ८(१) (घ्)] |
| सार्वजनिक राबत्याची जागा | .. place of public resort | [क. ८(१) (घ्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.